ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# भारतीय दुग्ध व्यवसाय क्षेत्रावर कोविड-19 चा प्रभाव

**महाजन संजय बाबुराव**

*(सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग), शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कळंबोली, नवी मुंबई.*

**प्रस्तावना: -**

कोरोनाव्हायरस साथ रोग जगभरात झपाट्याने पसरल्यामुळे याचा जगभरातील लाखो लोकांचे जीवन आणि उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम घडून आला. 30 जानेवारी 2020 रोजी भारतात पहिल्या संसर्ग रुग्णाची नोंद झाली. त्यामुळे शासकीय पातळीवर महामारीचा प्रसार रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या. COVID-19 हा अत्यंत संसर्गजन्य असल्याने ह्या साथीच्या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी 25 मार्च 2020 पासून देशव्यापी लॉकडाऊनची अत्यंत कठोर अंमलबजावणी करण्यात आली. सुरुवातीच्या काही आठवड्यांदरम्यान निर्बंध कठोर होते आणि देशभरातील किरकोळ आस्थापने, शैक्षणिक संस्था, धार्मिक उपासनेची ठिकाणे यासह सर्व अनावश्यक कार्ये आणि व्यवसाय सुरू करण्यास मनाई होती. त्यानंतर, देशातील बहुतेक भागांमध्ये टप्प्याटप्प्याने हे निर्बंध हळूहळू कमी करण्यात आले. करोना महामारीमुळे 2020-21 मध्ये भारतीय GDP घटण्याच्या शक्यतेकडे अनेक अहवालांनी लक्ष वेधले. हा एक चिंताजनक संकेत होता. कारण चांगले राहणीमान, गरीबीतील घट आणि इतर सामाजिक-आर्थिक निर्देशकांमध्ये सुधारणा घडवून आणण्यात उच्च स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे मोठे योगदान राहते. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी कृषी आणि संलग्न क्षेत्राला खूप महत्त्व आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

हे क्षेत्र भारतीय राष्ट्रीय उत्पन्नात जवळजवळ एक षष्ठांश योगदान देते आणि सुमारे 50% कामगारांना रोजगार प्रदान करते. कृषी आणि संलग्न क्षेत्र हे राष्ट्राची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मूलभूत आहे. दुग्धव्यवसाय हे कृषी संलग्न क्षेत्रातील एक उदयोन्मुख उपक्षेत्र आहे. आणि हे क्षेत्र गेल्या पाच वर्षांत 5% हून अधिक चक्रवाढ वार्षिक वृद्धी दराने (a compound annual growth rate) वाढत आहे. दूध व्यवसाय हा शेतीचा जोडधंदा म्हणून केला जातो. हजारो ग्रामीण कुटुंबांसाठी दुग्धव्यवसाय हे उपजीविकेचे मुख्य साधन आहे. भारतीय ग्रामीण कुटुंबांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील ग्राहकांशी जोडण्यात दुग्ध व्यवसाय क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या उपलब्धतेत सातत्यपूर्ण वाढीसह भारत हा जगभरात दुग्धजन्य पदार्थांचा अग्रगण्य उत्पादक आणि ग्राहक आहे. तथापि, कोरोना विषाणू संसर्गजन्य रोग साथीच्या (COVID-19) उदयाने भरभराट होत असलेल्या दुग्ध

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS

Original Research Article

व्यवसाय क्षेत्राला अशा प्रकारे वेसण घातली आहे की, भविष्यातील धोक्यांना तोंड देण्यासाठी सध्याच्या परिस्थितीतून आपल्याला अनेक गोष्टी शिकता येतील. प्रस्तुत शोधनिबंधात "**भारतीय दुग्ध व्यवसाय क्षेत्रावर कोविड-19 चा प्रभाव**" याचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती: -**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यासाठी Basic Animal Husbandry Statistics-2020, Annual Report-2020-21, Department of Animal Husbandry & Dairying, Various Economic Survey, National Dairy Development Board Report, NABARD Reports, विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये: -**

1. वैश्विक आणि भारतीय दुग्ध उत्पादनाच्या स्थितीचे अध्ययन करणे.
2. करोना महामारीमुळे दुग्ध व्यवसायासमोर निर्माण झालेल्या समस्यांचे अध्ययन करणे

**जागतिक दूध उत्पादनाची स्थिती: -**

2019 मध्ये जागतिक दुधाचे उत्पादन 52% नी वाढून 883 दशलक्ष टन झाले. 2019 मधील 2000 सर्वात मोठ्या दूध उत्पादक प्रदेशाच्या तुलनेत एकूण 42% सह 304 दशलक्ष टनांची वाढ घडून आली. युरोप (26%), अमेरिका (23 %), आफ्रिका (5%) आणि ओशनिया (3%) हे प्रदेश पुढे आहेत. विशेषतः 2000 ते 2019 या कालावधी दरम्यान आशियातील दुग्ध उत्पादनात दुप्पटीने वाढ घडून येऊन ते 170 दशलक्ष टनांवरून 369 दशलक्ष टन झाले. मुख्यतः 2019 मध्ये भारत 108 दशलक्ष टन दूध उत्पादनात वाढ घडवून आल्यामुळे जागतिक एकूण उत्पादनात 21% हिस्सा असलेला सर्वात मोठा दूधाचे उत्पादन करणारा देश (प्रथम क्रमांक) आहे. 11% वाट्यासह युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर इतर मुख्य उत्पादक पाकिस्तान, चीन, ब्राझील, जर्मनी, रशियन फेडरेशन आणि फ्रान्स या देशांचा जागतिक दूध उत्पादनात प्रत्येकी 3 ते 6 टक्के वाटा आहे. प्रमुख तीन दूध उत्पादकांचा एकत्रित वाटा एकूण 39% चा आहे की, जो 2018 प्रमाणेच होता. जागतिक पातळीवर दूध उत्पादन करणाऱ्या प्रमुख 10 देशांची स्थिती खालील पत्रकात दर्शविली आहे.

Table No. 01, World’s Top Ten Milk Producing Countries-2019

| Sr. No | Countries | Production (in Thousand tonnes) | % of global production |
|---|---|---|---|
| 1. | India | 187633.0 | 21.24 |
| 2. | United States of America | 99082.2 | 11.20 |
| 3. | Pakistan | 55957.2 | 6.33 |

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Issues– II
March – April 2022
OPEN ACCESS
Original Research Article

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | China | 36792.8 | 4.16 |
| 5. | Brazil | 36174.1 | 4.09 |
| 6. | Germany | 33102.6 | 3.74 |
| 7. | Russian Federation | 31344.7 | 3.54 |
| 8. | France | 25909.0 | 2.93 |
| 9. | New Zealand | 21872.2 | 2.47 |
| 10. | Netherland | 14943.8 | 1.69 |
| 11. | Total World Milk Production | 883283.7 | 100 |

Source: - World Food and Agriculture 2021 Statistical Yearbook, Food and Agriculture Organization of the United Nations Rome. Table No. 22, Page No. 177 to 181




**भारतीय दुग्ध व्यवसाय स्थिती: -**

दुग्ध व्यवसाय ही एक कृषी वस्तू असून ह्या व्यवसाय क्षेत्राचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत 5% योगदान आहे. हा व्यवसाय 8 कोटींहून अधिक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष रोजगार देतो. जागतिक दूध उत्पादनात भारताचा वाटा 23% असून भारत हा जागतिक दूध उत्पादन क्रमवारीत प्रथम स्थानावर आहे. देशातील दुधाचे उत्पादन 2020-21 मध्ये सुमारे 6.2% च्या चक्रवाढ वार्षिक दराने वाढून 209.96 दशलक्ष टनांवर पोहोचले आहे. देशात सन 2014-15 मध्ये दूध उत्पादन 146.31 दशलक्ष होते. वर्ष 2020-21 मध्ये अखिल भारतीय दरडोई दुधाची उपलब्धता (तात्पुरती) 427 ग्रॅम प्रतिदिन आहे. सन 1950-51 ते 2020-21 यादरम्यान दूध उत्पादन आणि दरडोई दुधाची उपलब्धता खालील पत्रकात दर्शविला आहे.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS

Original Research Article

पत्र क्रमांक-1, दुग्ध उत्पादन आणि दुधाची प्रतिव्यक्ती उपलब्धता

| अ. न. | वर्ष | दूध उत्पादन (मिलियन टनामध्ये) | प्रतिव्यक्ती दुधाची उपलब्धता | अ. न. | वर्ष | दूध उत्पादन (मिलियन टनामध्ये) | प्रतिव्यक्ती दुधाची उपलब्धता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 1950-51 | 17.0 | 124 | 18. | 2004-05 | 92.5 | 233 |
| 2. | 1960-61 | 20.0 | 124 | 19. | 2005-06 | 97.1 | 241 |
| 3. | 1970-71 | 22.0 | 112 | 20. | 2006-07 | 102.6 | 251 |
| 4. | 1980-81 | 31.6 | 128 | 21. | 2007-08 | 107.9 | 260 |
| 5. | 1990-91 | 53.9 | 176 | 22. | 2008-09 | 112.2 | 266 |
| 6. | 1991-92 | 55.6 | 178 | 23. | 2009-10 | 116.4 | 273 |
| 7. | 1992-93 | 58.0 | 182 | 24. | 2010-11 | 121.8 | 281 |
| 8. | 1993-94 | 60.6 | 186 | 25. | 2011-12 | 127.9 | 290 |
| 9. | 1994-95 | 63.8 | 192 | 26. | 2012-13 | 132.4 | 299 |
| 10. | 1995-96 | 66.2 | 195 | 27. | 2013-14 | 137.7 | 307 |
| 11. | 1996-97 | 69.1 | 200 | 28. | 2014-15 | 146.3 | 322 |
| 12. | 1997-98 | 72.1 | 205 | 29. | 2015-16 | 155.5 | 337 |
| 13. | 1998-99 | 75.4 | 210 | 30. | 2016-17 | 165.4 | 355 |
| 14. | 1999-2000 | 78.3 | 214 | 31. | 2017-18 | 176.3 | 375 |
| 15. | 2000-01 | 80.8 | 215 | 32. | 2018-19 | 187.7 | 394 |
| 16. | 2001-02 | 84.3 | 221 | 33. | 2019-20 | 198.4 | 406 |
| 17. | 2002-03 | 86.2 | 224 | 34. | 2020-21 | 209.96* | 427* |
| 18. | 2003-04 | 88.1 | 225 | * Data is Provisional | | | |

**Source**:

1. Economic Survey 2003-04, Ministry of Finance, Government of India. Page No. 158
2. Economic Survey 2019-20, Ministry of Finance, Government of India. Page No. 205
3. Economic Survey 2021-22, Ministry of Finance, Government of India. Page No. 251
3. Basic Animal Husbandry Statistics-2020, Department of Animal Husbandry & Dairying, Ministry of Fisheries, Animal Husbandry and Dairying, GoI, New Delhi. Page No. 7, 29
4. https://www.nddb.coop/sites/default/files/statistics/Mp%20India-ENG-2019.pdf

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS

Original Research Article




**दुग्ध व्यवसायातील संधी: -**

Covid-19 महामारी लॉकडाऊन कालावधीत दुग्ध व्यवसाय क्षेत्रात अनेकविध संधी निर्माण झाल्या आहेत. जसे: -

1.**खाण्याच्या सवयींमधील संभाव्य बदल आणि आरोग्याविषयी जागरूकतेतील वाढ**: - करोना महामारीने दुग्धव्यवसायाला लाभ होण्याची संधी निर्माण झाली आहे. कारण ग्राहकांचा मोठा वर्ग मांस-आधारित प्रथिनांकडून दुग्ध-आधारित प्रथिनांकडे वळण्याची शक्यता अधिक निर्माण झाली आहे. Covid-19 ने लोकांमध्ये आरोग्यदायी आहाराचा अवलंब करण्याच्या गरजेबद्दल अधिक जागरुकता निर्माण केली आहे.

2. **दुग्ध व्यवसायाच्या विस्ताराला वाव**: - कृषी क्षेत्रापेक्षा दुग्धव्यवसाय क्षेत्राचा विकासाचा दर उच्च असल्यामुळे या क्षेत्राच्या विस्ताराला अधिक वाव आहे.

3. **साठवणूक आणि शीतकरण सुविधा**: - मोठ्या प्रमाणात साठवणूक आणि दूध शीतकरण सुविधांची उभारणी करण्यात आल्यास उत्पन्न वाढ आणि रोजगारीच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे.

4. **दूध उत्पादनात वाढ**: - सरकारने सुरू केलेल्या FMD आणि HS लसीकरण कार्यक्रमामुळे दूध उत्पादनात वाढ घडून आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध उत्पादनाच्या स्पर्धात्मकतेत वाढ घडून आल्याने दुग्ध व्यवसाय क्षेत्रासाठी निर्यातीच्या अधिक संधी निर्माण झाल्या आहेत.

**दुग्ध व्यवसाय क्षेत्रासमोरील वर्तमान संकट: -** देशातील दुग्ध उत्पादन क्षेत्रावर कोविड-19 प्रेरित लॉकडाऊनचा परिणाम असाधारण घडून आला आहे. असा अंदाज वर्तविला जात आहे की, हा परिणाम दीर्घकाळ चालू राहू शकतो आणि त्याचा उपजीविकेच्या संधी, रोजगार आणि दुग्ध उत्पादन क्षेत्राच्या एकूण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. अनेक महिन्यांच्या लॉकडाऊनमुळे पशुधन आणि पशुधन उत्पादनांची पुरवठा साखळी पूर्णतः खंडित झाली. कोविड-19 साथीच्या रोगाने दुग्ध उद्योगाला लाभ मिळविण्याची संधी खुली झाली कारण मोठा ग्राहक वर्ग हा मांस-आधारित प्रथिनांवरून दुग्ध-आधारित प्रथिनांकडे वळू शकतो.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS

Original Research Article

करोना महामारीने लोकांना निरोगी आहाराचा अवलंब करण्याच्या गरजेबद्दल अधिक जागरूक केले आहे. इतर क्षेत्रांच्या तुलनेत दुग्ध उत्पादन क्षेत्र हे अधिक लवचिक आहे आणि विविध उद्योग अहवालानुसार या क्षेत्रात पुनरूज्जीवनाची चिन्हे दिसून येतात. दुग्ध उपक्षेत्राचे वितरण अधिक न्याय्य असणे ही बाब कृषी आणि संलग्न क्षेत्राच्या नवीन वृद्धीचे साधन आहे. कोविड-19 च्या जागतिक महामारीमुळे लॉकडाऊन कालावधीत रेस्टॉरंट, हॉटेल्स, चहाची दुकाने इत्यादी बंद ठेवण्यात आली परिणामतः दूध, खवा, पनीर, आईस्क्रीम, चीज इत्यादी दुग्धजन्य पदार्थांची विक्री आणि वापरामध्ये मोठ्या प्रमाणात घट घडून आली. महामारीमुळे आईस्क्रीमचा वापर 60-70% ने घटला. लॉकडाऊनच्या सुरुवातीला दुग्ध उत्पादन क्षेत्रात 30 ते 35 % ने घट घडून आली याचे कारण कोविड-19 जागतिक महामारी कालावधीत लॉकडाऊनमुळे अनेक लोक बेरोजगार झाले आणि लोकांच्या उत्पन्नात मोठी घट घडून आली परिणामतः लोकांची क्रयशक्ती घटली. संपूर्ण बाजार बंद असल्याने दुभत्या जनावरांच्या दूध विक्रीत घट झाली तसेच दूध उत्पादकांना अल्प दराने दुधाची विक्री करावी लागली. त्यामुळे दूध उत्पादकांचे दुहेरी नुकसान झाले. इतर क्षेत्रांप्रमाणेच दुग्धव्यवसाय क्षेत्रातील दुग्धजन्य उत्पादने ग्राहकांना पुरवठा साखळीद्वारे पुरविली जातात. परंतु कोविड-19 महामारीमुळे लॉकडाऊन दरम्यान पुरवठा साखळी तुटली. त्यामुळे दुग्धजन्य पदार्थांचा वापर व विक्री कमी झाल्याने दूध उत्पादकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

1. **विक्री आणि आर्थिक उलाढाल**: - Covid-19 महामारी लॉकडाऊन कालावधीदरम्यान मोठ्या प्रमाणात दूध खरेदी आणि दुधाची अल्प विक्री यामुळे दुग्ध सहकारी संस्थांनी दीर्घकालीन टिकाऊ अशा दुधाची भुकटी, लोणी, तूप इत्यादी पदार्थांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले. विविध दुग्धजन्य उत्पादनांच्या निर्मितीमुळे निधी प्रवाहात घट घडून आल्यामुळे शेतकऱ्यांना पैसे देणे कठीण होऊन बसले. तसेच आईस्क्रीम, सुगंधी दूध, तूप, चीज इत्यादी उच्च किंमत असणाऱ्या उत्पादनांची मागणी घटल्यामुळे अगदी अल्प प्रमाणात दुधापासून पनीर आणि दही असे उच्च मूल्य असणारे उत्पादन तयार करण्यात येत असल्यामुळे विक्री आणि आर्थिक उलाढालीवर याचा प्रतिकुल परिणाम घडून आला. सहकारी संस्थांकडून होणारी दूध विक्री फेब्रुवारी 2020 ते एप्रिल 2020 या कालावधीत घटली.
2. **अल्प किमतीने दुधाची खरेदी:** - दूध विक्री आणि आर्थिक उलाढाली वरील प्रतिकूल परिणामाने सद्यस्थितीत सहकारी पातळीवर दूध खरेदीची क्षमता कमी झाली किंवा सहकारी संस्थांना कमी किमतीत दूध खरेदी करावे लागले. याचा थेट प्रतिकूल परिणाम दुग्ध उत्पादक शेतकऱ्यावर घडून आला.
3. **सहकारी संस्थांना अतिरिक्त दूध**: - Covid-19 महामारीमुळे मोठ्या संख्येने लहान खाजगी दुग्धालयांचे संचालन बंद केल्यामुळे सहकारी संस्थांना अतिरिक्त दूध उपलब्ध होऊ लागले. लहान खाजगी दुग्धालये ही प्रामुख्याने दुधाची मिठाई आणि शहरांमध्ये दूध वितरणाचे काम करीत होती. महामारीच्या पार्श्वभूमीवर घालण्यात आलेल्या निर्बंधांमुळे खाजगी तसेच सहकारी संस्थांकडून हॉटेल आणि उपहारगृहांच्या दूध पुरवठ्यावर परिणाम घडून आला.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS

Original Research Article

4. **खाजगी दुग्धालयांचा मर्यादित पुरवठा आणि व्यवसाय बंद**: - कंत्राटी कामगारांची कमतरता, वितरण केंद्रे बंद, पॅकेजिंग साहित्य मिळण्यातील अडचण इत्यादी समस्यांमुळे खाजगी दुग्ध केंद्रानी आपला पुरवठा मर्यादित केला अथवा आपली दुकाने बंद केली.
5. **मूल्यवर्धन ही काळाची गरज**: - करोना महामारी कालावधीत सामान्यतः दूध उत्पादनात घट घडून आली तसेच कमकुवत हंगाम असताना देखील सहकारी संस्थांकडून अतिरिक्त दूध खरेदी करण्यात आली. दूध लोणी, चीज, तूप आणि दूध पावडर यांसारख्या मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थांमध्ये रूपांतरित करून अतिरिक्त दुधाच्या आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी जिल्हा दूध संघांना ठेवावी लागणार आहे.
6. **स्थानिक दूध ग्रिड किंवा स्थानिक दूध संकलन आणि शीतकरण केंद्रांची निर्मिती**: - स्थानिक दूध ग्रीड तयार करून स विक्रेते, संघटित दुग्धशाळा व दूध प्रक्रिया संस्थांशी जोडण्याची गरज आहे. Covid-19 सारखी परिस्थिती हाताळण्यासाठी दुधाची कमतरता असलेल्या प्रदेशांमध्ये दुग्ध व्यवसायाला मदत करण्याचे एक मोठे आव्हान आहे.
7. **संघटित क्षेत्राकडून दुधाची अधिक खरेदी**: - भारतीय पशुधन बाजार अविकसित आणि पुरवठा साखळी खराब आहे. करोना महामारी कालावधीत सहकारी आणि खाजगी दुग्ध संस्थांकडून केवळ 20% दुधाची खरेदी करण्यात आली तर 32% दूध असंघटित क्षेत्रात विकण्यात आले. दुग्ध सहकारी संस्थांद्वारे दूध खरेदी विक्रीची यंत्रणा ही दुग्ध बाजारापेक्षा अधिक लवचिक असते आणि कोविड-19 महामारीच्या काळात विक्रेत्या-चालित बाजारपेठांमध्ये दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान जास्त होते.
8. दूध उत्पादन हे हंगामी चढउतारांच्या अधीन असते. प्राणी, विशेषतः म्हशी, हिवाळयात-वसंत ऋतुमध्ये जास्त आणि उन्हाळयात कमी दूध देतात.
9. दूध उत्पादनातील चढ-उतारांचा सामना करण्यासाठी शेतकरी सामान्यतः हिवाळी हंगामातील अतिरिक्त दुधाचे रूपांतर स्किम्ड मिल्क पावडर (SMP) आणि उन्हाळी महिन्यांत पुनर्रचनेसाठी तूप अथवा लोण्यामध्ये करतात.
10. वरील समतोलीत प्रतिमान हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, वसतिगृहे, कॅन्टीन आणि मिठाईची दुकाने कोविड नंतर बंदमुळे झालेल्या मागणीच्या नाशामुळे अकार्यक्षम बनले आहे.
11. लग्न आणि इतर सामाजिक कार्यक्रमांवरती असलेल्या शासकीय निर्बंधनामुळे दुधाची मोठ्या प्रमाणात घडून येणारी विक्री कोलमडली आहे. परिणामतः दुधाचे दर प्रतिलिटर 10 ते 13 रुपयांनी कमी झाले आहेत.
12. दुग्धशाळा उन्हाळयात आणि पावसाळयात पावडर आणि चरबीचा साठा जमा करत आहेत. चाऱ्याची उपलब्धता, म्हशींचे बछडे आणि तापमानातील घटीमुळे येत्या काही महिन्यांत उत्पादनात वाढ झाल्यावर ही अतिरिक्त साठ्याची परिस्थिती आणखी बिकट होईल.
13. दुग्ध उत्पादनाच्या मागणी आणि पुरवठ्यात ताळमेळ नसल्यामुळे दुग्ध व्यवसाय क्षेत्रावर संकट ओढवले आहे.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS Original Research Article

**दुग्धव्यवसाय क्षेत्रासमोरील इतर समस्या: -**

1. **दुग्धव्यवसाय क्षेत्रातील मंदी:** - मागील 15 वर्षांत भारतात दुग्ध उत्पादनात दुप्पटीने वाढ घडून आली असली तरीदेखील अलिकडच्या वर्षांत वाढ 3% पेक्षा कमी राहिली आहे. हे चिंतेचे कारण आहे. दुधाचा महापूर उपक्रमाच्या समाप्तीपासून दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील गुंतवणुकीत घट हे मंदीचे कारण आहे.
2. **अंदाजपत्रकीय तरतुदीचा अभाव:** - सध्या दुग्धव्यवसाय ही भारतातील अव्वल दर्जाची वस्तू आहे. दुधाचे उत्पादन मूल्य हे तांदूळ आणि गहू यांच्या एकत्रित उत्पादन मूल्याच्या जवळपास आहे. एकूण GDP मध्ये दुग्ध व्यवसाय क्षेत्राचे महत्त्व असूनही, ह्या क्षेत्रासाठी कृषी क्षेत्रापेक्षा कमी अंदाजपत्रकीय तरतूद केली जाते.
3. **अनौपचारिक दुग्धव्यवसाय**: - भारतीय दुग्धव्यवसाय क्षेत्राचे सर्वात मूलभूत वैशिष्ट्य म्हणजे ते अजूनही प्रामुख्याने असंघटित आहे. भारतात उत्पादित होणाऱ्या एकूण दुधापैकी केवळ 18 ते 20% संघटित क्षेत्राद्वारे केले जाते. विक्रीयोग्य दुधापैकी 75% असंघटित क्षेत्राचा वाटा आहे. यामुळे, असंघटित क्षेत्र अद्याप आधुनिक प्रक्रिया पायाभूत सुविधांमध्ये सहभागी होऊ शकलेले नाही.
4. **खराब प्रजनन पायाभूत सुविधा आणि आनुवंशिकी: - भारतीय दुग्धव्यवसायाचे यश हे मुख्यत: प्राण्यांच्या वाढत्या संख्येमुळे होते, उत्पादकतेमुळे नव्हे. प्रजनन पायाभूत सुविधांचे साठे आणि कृत्रिम गर्भाधान, भ्रूण हस्तांतरण इ. सारख्या प्रगत प्रजनन पद्धती आहेत.**
5. **पशुखाद्य आणि चारा: - हिरव्या चाऱ्याचा आणि चांगल्या दर्जाच्या खाद्याचा तीव्र आणि सतत वाढणारा तुटवडा ही एक गंभीर समस्या.**
6. **कोल्ड चेन पायाभूत सुविधांचा अभाव: - गावपातळीवर दूध दूषित आणि खराब होण्यापासून रोखण्यासाठी शीतकरण संयंत्र आणि बल्क कुलर यासारख्या आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव आहे.**

**उपाय व सूचना:**

1. सरकारने संघटित क्षेत्रातील खरेदीचा आधार वाढविण्यावर काम केले पाहिजे.
2. मोठ्या प्रमाणात दूध साठवणूक आणि शीतकरण पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे.
3. मूल्यवर्धनाला चालना आणि स्वच्छ दूध उत्पादनास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.
4. दुभत्या जनावरांच्या देखभालीसाठी एक कॅलेंडर तयार करून यामध्ये लसीकरण, बाह्य आणि अंतः कृमिनाशक, गर्भधारणा, दूध उत्पादन, सामान्य आरोग्य, निर्जंतुकीकरण इत्यादीचा तपशील नेहमी उपलब्ध करून देण्यात यावा.
5. सरकारने COVID-19 महामासीसारख्या आपत्ती परिस्थितीत राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाच्या (NDDB) माध्यमातून थेट दुधाची तात्पुरती खरेदी करावी. राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळ स्किम्ड मिल्क पावडर (SMP) आणि बटर सारख्या प्रक्रिया

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Issues– II
March – April 2022
OPEN ACCESS
Original Research Article

केलेल्या दुग्धजन्य उत्पादनांचा बफर स्टॉक तयार करू शकते.

6. सरकारने शाळांमध्ये दुग्धजन्य पदार्थांचे वाटप माध्यान्ह भोजन योजनेच्या माध्यमातून करण्याचा विचार करावा. यामुळे दुग्धव्यवसाय क्षेत्रासमोरील संकट आणि पौष्टिक सुरक्षा या दोन्हींवर उपाय करता येतील.
7. दुधारू जनावरांची उत्पादकता वाढविण्यासाठी उत्तम आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्याची, प्रजनन सुविधा आणि दुग्धजन्य प्राण्यांचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता आहे. यामुळे दूध उत्पादनाचा खर्च कमी होऊ शकतो.
8. दूध उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी पशुवैद्यकीय सेवा, कृत्रिम गर्भाधान (artificial insemination- AI), खाद्य आणि शेतकऱ्यांना शैक्षणिक सुविधांची उपलब्धता निश्चित करण्याची आवश्यकता आहे. या दिशेने सरकार आणि दुग्ध उद्योग महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात.
9. दर्जेदार आणि सुरक्षित दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनासाठी योग्य कायदेशीर मदतीसह सर्वसमावेशक धोरणाची आखणी व अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.
10. विजेची कमतरता दूर करण्यासाठी सौरऊर्जेवर चालणाऱ्या दुग्ध प्रक्रिया युनिटमध्ये गुंतवणूक करण्याची गरज आहे.
11. दुग्ध सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी सरकारने शेतकरी उत्पादक संघटनांना प्रोत्साहन दिले पाहिजे.
12. अतिरिक्त नुकसानीची तीव्रता कमी करण्यासाठी लॉकडाऊन नंतरच्या टप्प्यासाठी सरकारने योग्य धोरणाची आखणी व अंमलबजावणी केली पाहिजे.
13. विष्कळीत पुरवठा साखळी त्वरीत पूर्ववत आणि सर्व प्रमुख आदानांची पुरेशा प्रमाणात उपलब्धता निश्चित करावी.
14. लॉकडाऊननंतरच्या टप्प्यात शेतकऱ्यांनी त्यांच्या जनावरांच्या आरोग्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे.
15. दूध उत्पादक आणि दुधावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था यांच्यासाठी विशेष पत योजना तयार करून तिची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.
16. दुधाची मागणी वाढविण्यासाठी सरकारने गरीब जनतेला स्वस्त किंमतीत दुधाचा पुरवठा केला पाहिजे.
17. केंद्र आणि राज्य सरकारे, खाजगी कंपन्या आणि डेअरी सहकारी संस्थांनी दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात किंवा गरीब शेतकऱ्यांप्रती त्यांच्या सामाजिक जबाबदारीचे प्रतीक म्हणून मौल्यवान आदाने आणि सेवा उपलब्ध करून द्याव्यात.

**समारोप:** -

दुग्धव्यवसाय शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती निश्चितच घडून येऊ शकते. दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दूध संकलनात वाढ करणे आणि अतिरिक्त खरेदी केलेले दूध स्किम्ड मिल्क पावडर व बटरमध्ये वळविण्याची उत्तम व्यवस्था निर्माण केल्यास कमी कालावधीत दुध आणि दुग्धजन्य पदार्थांचा पर्याप्त पुरवठा आणि निर्यातीची गरज देखील पूर्ण करता येईल. लॉकडाऊन दरम्यान घडून आलेली दूध खरेदी असे सूचित करते की, दुग्धशाळांनी कमकुवत अथवा दुर्बल हंगामी गरजांची पूर्तता करण्यासाठी

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Issues– II
March – April 2022

OPEN ACCESS

Original Research Article

दूध आणि दुग्धजन्य वस्तूंचा साठा तयार करण्यास सुरुवात केली आहे. एक यशस्वी व्यवसाय संधी म्हणून मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्याच्या दृष्टीने दुग्धव्यवसाय क्षेत्राने देऊ केलेल्या अफाट शक्यतांचा देशाच्या सर्वांगीण सामाजिक-आर्थिक विकासासाठी एक प्रमुख यंत्रणा म्हणून उपयोग केला जाऊ शकतो. दूधाच्या मागणीनुसार पुरवठा पूर्णत: समायोजित करणे शक्य नसल्यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांचे अधिक नुकसान घडून आले आहे. तथापि लॉकडाऊन दरम्यान दूध उत्पादक शेतकरी आणि प्रक्रिया एककांनी विविध व्यूहरचनांची आखणी व अंमलबजावणी करून नुकसान कमी करण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न केले. बहुतेक शेतकऱ्यांनी अतिरिक्त दुधाचे रूपांतर दही, तूप, पनीर यासारख्या दीर्घकाळ टिकणाऱ्या उत्पादनांमध्ये केले. शेतकऱ्यांनी शक्य असेल तिथे ग्राहकांना दूध घरपोच उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न देखील केला. शासकीय पातळीवरून संघटित क्षेत्रातील दूध खरेदीचा आधार वाढविणे, साठवणूक व बल्क दूध शीतकरण पायाभूत सुविधा निर्माण करणे, मूल्यवर्धनाला चालना देणे आणि स्वच्छ दूध उत्पादनास प्रोत्साहन देणे इत्यादीवर काम झाले पाहिजे. दुग्धव्यवसाय हे इतर क्षेत्रांच्या तुलनेत अधिक लवचिक आहे. विविध उद्योग अहवालांनुसार दुग्ध व्यवसाय क्षेत्रात पुनरुज्जीवनाची चिन्हे दिसून येत आहेत. दुग्धव्यवसाय उपक्षेत्र वितरणात अधिक न्याय्य असणे ही बाब कृषी आणि संलग्न क्षेत्रांचे नवीन विकास जनित्र आहे. सरकारच्या सतत पाठिंब्याने आणि निधीच्या अनुकूल खर्चामुळे दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन मिळाले आहे. परिणामतः दुग्ध प्रक्रिया क्षमतेत वाढ घडून आली आहे. जर भारताला दुग्ध निर्यात करणारा देश म्हणून आपली ओळख जागतिक पातळीवर निर्माण करावयाची असेल तर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम असलेल्या योग्य उत्पादन प्रक्रिया आणि विपणन पायाभूत सुविधा विकसित करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. पुनरुज्जीवनाची मंद गती लक्षात घेता दबाव येण्याची शक्यता आहे.

**References: -**

World Food and Agriculture 2021 Statistical Yearbook, Food, and Agriculture Organization of the United Nations Rome. Page No. 15, 16 & 177 to 181, Table No. 22

Impact Assessment of COVID-19 on Indian Agriculture & Rural Economy, Department of Economic Analysis & Research, National Bank for Agriculture and Rural Development Mumbai. August 2020, Page No. 5, 13, 16

**Agricultural Situation in India, Publication Division,** Directorate of Economics and Statistics, Department of Agriculture, Cooperation & Farmers Welfare Ministry of Agriculture & Farmers Welfare Government of India, New Delhi. VOL. LXXVII, No. 08, November, 2020, Page No. 21, 22, 26

Annual Report 2020-2020, Department of Animal Husbandry & Dairying, Ministry of Fisheries, Animal Husbandry and Dairying, GoI, New Delhi. Page No. 4 to 5, 55 to 56

Basic Animal Husbandry Statistics-2020, Department of Animal Husbandry & Dairying, Ministry of Fisheries, Animal Husbandry and Dairying, GoI, New Delhi. Page No. 7 to 10, 29 to 59

Economic Survey 2003-04, Ministry of Finance, Government of India, New Delhi. Page No. 158

Economic Survey 2019-20, Ministry of Finance, Government of India, New Delhi. Page No. 205

Economic Survey 2021-22, Ministry of Finance, Government of India, New Delhi. Page No. 251, 252

Food Outlook - Biannual Report on Global Food Markets – November 2020, Food & Agriculture Organization of the United Nations (FAO), Page No. 07

P. Balamurugan, Impact of Covid-19 on Agriculture and Allied Sectors in India, Global Development Review, Vol.5, No.1 January – June 2021Page No. 13

Gunjan Bhandari1 and Ravishankar K.M., Implications of COVID-19 for Indian Dairy Sector, Food, and Scientific Reports, May 2020, Volume 1: Special issue, Page No. 45, 46

Lalita Garg and Kamal Kumar, Dairy sector in Pre, during COVID-19 and Post pandemic periods: A review The Pharma Innovation Journal 2021, 10(2), Page No. 621 to 625

FICCI Paper on Development of Dairy Sector in India, Federation of Indian Chambers of Commerce and industry, New Delhi page no. 10, 11, 27, 28

Naresh Singla, October 2020, Impact of COVID-19 Pandemic on Dairy Industry in Punjab: Major Concerns and Policy Options, Centre for Development Economics and Innovation Studies (CDEIS), Punjabi University, Patiala. Page No. 1 to 4

Overview of global dairy market developments in 2020, Dairy Market Review, Markets and Trade - Economic & Social Development, Food, and Agriculture Organization of the United Nations, Rome, Italy. Page No. 2 & 11

B.S. Chandel, Anil Kumar Dixit, Ajmer Singh, and Asha Devi (November 2020) Economic Analysis of the Impact of COVID-19 Lockdown on Indian Dairy Sector, Agricultural Situation in India, Directorate of Economics and Statistics Department of Agriculture, Cooperation & Farmers Welfare Ministry of Agriculture & Farmers Welfare Government of India, New Delhi. Page No. 21, 26

Lockdown will reduce interest rates on working capital loans for the dairy sector, Ministry of Fisheries, Animal Husbandry, and Dairy Development, PIB Mumbai. New Delhi, 14 May 2020

Dairy industry in India to grow by 9-11% in FY22, says the report, Business-Standard, Mumbai, November 09, 2021

https://www.drishtiias.com/pdf/1596546296-crisis-in-the-dairy-sector.pdf

https://agriallis.com/wp-content/uploads/2020/08/IMPACT-ON-INDIAN-DAIRY-SECTOR-DURING-COVID-19-CHALLENGES-OPPORTUNITIES.pdf

https://indianexpress.com/article/opinion/editorials/coronavirus-impact-on-dairy-sector-rural-business-6537837/

**Cite This Article:**

**महाजन संजय बाबुराव,** *(2022)* भारतीय दुग्ध व्यवसाय क्षेत्रावर कोविड-19 चा प्रभाव, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *XI (II), 239-249.*